|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव दि. 30 ( ) व्यवसाय सुरू करण्यासाठी पैशाची नाही तर नाविन्यपूर्ण कल्पनांची अधिक गरज असते त्यामुळे तरूण पिढी आपल्याला प्राप्त झालेले ज्ञान आणि बाजारपेठेची गरज यांची सांगड घालून व्यवसायात उतरल्यास निश्चितच यश मिळेल असे प्रतिपादन सुप्रसिध्द कार्पोरेट व बिझनेस ट्रेनर विनीत बनसोडे यांनी केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या वतीने विद्यापीठात आयोजित युवा उद्योजक विकास कार्यक्रमात श्री. बनसोडे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील होते. सिमन्स लिमिटेडचे व्यवस्थापन समिती संचालक आणि सुप्रसिध्द उद्योजक विजय परांजपे, सॅटर्डे क्लबचे संयोजक व्ही.पी.कुलकर्णी, संग्राम लिमये, कुलसचिव भ.भा.पाटील यांची मंचावर उपस्थिती होती. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट यांच्यात आज युवा उद्योजक घडविण्याबाबत झालेल्या सामंजस्य करारांतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

श्री.बनसोडे म्हणाले की, उद्योग सुरू करण्यासाठी खुप पैशांची गरज असते ही मानसिकता बदलावी लागणार आहे. व्यवसाय सुरू करण्यासाठी नवीन कल्पना गरजेच्या आहेत. या सुचलेल्या कल्पनांचे पेटंट करा त्यातूनही पैसे प्राप्त होतील असा सल्ला देत त्यांनी राकेश अग्रवाल,जगत शहा यांची उदाहरणे दिली. आजूबाजूच्या गरजा लक्षात घेवून त्यातून कल्पना सुचतात आणि तसा व्यवसाय करण्यासाठी प्रयत्न करता येवू शकतात मात्र त्यासाठी मेहनत करण्याची तयारी ठेवा. जो व्यवसाय करायचा आहे त्याची स्पष्टता ठेवा नाउमेद होवू नका असा सल्लाही त्यांनी दिला.

विजय परांजपे म्हणाले की, कोणताही व्यवसाय करण्यात कमीपणा बाळगू नका. लोकांच्या अडचणी शोधा त्या अडचणींना पर्याय देणारी उत्तरे शोधलीत तर नव्या कल्पना सुचतील आणि व्यवसाय सुरू करता येईल. व्यवसायासाठी आवड हवी त्यातून पैसा आपोआप येईल. समर्पण, चिकाटी या गोष्टींची गरज आहे त्यासोबतच व्यवसायातील अपयशाला घाबरू नका असा सल्लाही त्यांनी दिला.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील म्हणाले की, नोकरी करण्याच्या चाकोरीबध्द विचारातून तरूणांनी बाहेर पडावे यासाठी उमवि-तरूण उद्योजक अध्याय (एनएमयु-वायईसी) ची स्थापना करण्यात आली असून उद्योजक होण्यासाठी तरूणांना या माध्यमातून मार्गदर्शन केले जाणार आहे. आणि विशेष म्हणजे सॅटर्डे क्लबचे पदाधिकारी त्यासाठी वेळोवेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत यातून निश्चितच उद्योजक निर्माण होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सॅटर्डे क्लबचे संयोजक व्ही.पी.कुलकर्णी यांनी क्लबची भूमिका मांडताना तरूणांमधून उद्योजक व्हावे या भूमिकेतून हा क्लब काम करीत असल्याचे सांगितले. प्रारंभी केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक डॉ.भुषण चौधरी यांनी प्रास्ताविक केले. डॉ.राम भावसार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी सॅटर्डे क्लबचे संस्थापक अध्यक्ष माधवराव भिडे यांचा संदेश स्क्रीनवर दाखविण्यात आला. छबीराज राणे यांनी भिडे यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रशिक्षण व नियुक्ती केंद्राच्या अधिकारी कविता मंडोरे यांनी केले. डॉ.आर.जे.सरदार यांनी आभार मानले. यावेळी उमवि आणि सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट यांच्यात झालेल्या सामंजस्य करारावर कुलसचिव भ.भा.पाटील आणि व्ही.पी.कुलकर्णी यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या कार्यक्रमास तीनशे पन्नास पेक्षा अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

---

उमवि/16/ हस्तदेय/ 2018 — दिनांक : 30 जानेवारी, 2018

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--

( सुनील पाटील )

जनसंपर्क अधिकारी